सोवळे ओवळे

माझ्या आईचे सोवळे ओवळे फार असायचे तिचे जसजसे वय वाढत गेले त्याप्रमाणे सोळयांत वाढच झाली. आम्हाला त्याचा त्रास व्हायचा. प्रत्येक वेळी हात धुवूनच कोणत्याही वस्तुला हात लावायचा. जर कारण विचारले तर डोक्यांत खाजवता, कांनात तोडांत कुठेही हात असतो, म्हणून हात धुणे आले. तेव्हा खूप राग यायचा. आता स्वच्छतेच्या दृष्टिने ते योग्यच वाटते. फळीवरची भांडी धुवून घेणे. ताटे वाटया ओल्या फडक्यानी पुसणे हे त्यावेळी खूपच कटकटीचे काम वाटे. पण आम्ही आमच्या वेळी हेच केले कदाचित मुलाना नातवाना ही कटकटच वाटत असेल. पाळीच्या दिवसात तीन दिवस दूर बसणे हे पण आलेच त्याचे सामाजिक कारण तीन दिवस बायकानी कोणते ही काम करायचे नसे. कोरडे धान्य गहू ज्वारी वगैरे निवडणे हे काम असे. पण आमच्या घरी हया कामाला (तेलीण) बाई होती ती सर्व करायची. सोवळे म्हणजे स्वच्छता हा अर्थ घेतला तर आई बरोबर व आम्ही चूक. पण सणवार देवाची पूजा समई दिवे रोज समोरच्या देवळात तेल देणे हे वडीलांना आवडत नसे पण आई ते सर्व गडयाकडुन किंवा आम्हा मुलांकडून करवायची. आम्ही सात भांवडे होतो. पण मोठ्या मुलाने सकाळचा चहा, ताक घुसळणे, गडयानी घासलेली भांडी (सोळयांत) धूवून आंत आणणे आल्या गेल्याचा चहा ही सर्व कामे त्यानेंच करायची. पहिल्यांदा माझा आतेभाऊ शिकायला होता तो हे सर्व करी. तो आमच्या कडून आमचा छळ करून कसा गेला ती स्वतंत्र कहाणी आहे. मोठा भाऊ मॅट्रिक होई पर्यंत त्यानंतर ताई लग्ना पर्यंत (नंतर ती मुबईला गेली ) नंतर मी, माझ्यानंतर माझा भाऊ अशी परंपरा चालूच ठेवली, मोडली नाही.

मला चहा करता येईल की नाही असे आई विचारायची. शेवटची बहीण जेव्हा मुंबईला गेली तेव्हा त्यानंतर आईला म्हशीचे दूध सुध्दा काढायची. जेवणात उत्तमोत्तम प्रकार असायचे. लोणची तर खूप त-हेची आई करायची. आंबा लिंबू मिरची भोकर हयांचे तर लोणचे असायचे पण पिक्क्या आंब्याचे फेसून मोहरीचे केलेलो लोणचे देखील. असे एक आंबा घेऊन भात व खार खाल्ला की मस्त जेवण होत असे. पाव्हणे भरपूर असत. वडील वकील असल्यामुळे वडलांचे भाऊ आईचे वडील गांवाकडचे लोक जेवायला असायचे. कित्येक वेळा अगदी कोर्टाच्या वेळी साक्षीदार म्हणून काका यायचे व आम्ही आमची वाढलेली ताटे त्यानां द्यायची व शाळेंत जायचे. मधल्या सुट्टीत आई सर्व ठेवायची व थांबायची पण जेवणासाठी. ती सवय मला अजुनही आहे. मुलांसाठी, हयांच्यासाठी, जेवायला थांबायचे. जेवून घे असे हे म्हणत. मुलेही म्हणत, पण कधीही जेवले नाही. जेवावे असे वाटतही नसे.

नारळाची चटणी पोहे (कांदा घालून) व ओले पावटे दुधाच्या दशम्या पंचामृत हया गोष्टी नेहेमी असायच्या. कडवे-पावटे भिजत घातले की भरपूर लागत. पण सर्वानी थोडे थोडे सोलायचे कंपलसरी. तीच सवय मला होती. दरभंग्याला आम्ही सर्वजण मटार सोलायला बसायचो. गोड गोड म्हणून बरेच मटार कच्चे खायचो. श्रीखंड पुरी बासुंदी हेच प्रकार सणावारीं असत. कारण घरची म्हैस बासुंदीही बाहेरुन आणायची पध्दत नव्हतीच.  व बाहेर काही मिळायचें नाही. देवरुखला तर माझ्या लहानपणी एकपण

खाणावळ नव्हती. सर्व कांहीं घरीच करायचे. त्यामुळे पुण्याला सुध्दां सर्व खाण्याच्या गोष्टी मिळत असताना पण बाजारचे आवडायचे नाही. दहीवडे सामोसे रसगुल्ले शिरा साखरभात सर्व पदार्थ घरीच. शिरा, साखरभात गाजराचा हलवा करण्यांत हे पटाईत होते. ह्यांची आई लौकर म्हणजे वयाच्या 12 व्या वर्षी वारली होती. एकुलत्या एका मुलाला सावत्र
आईचा त्रास नको म्हणून सास-यानी दुसरें लग्न केले नाही. त्यांचे वय फार नव्हते. त्या काळी लहानपणीच मुलीची लग्न होत. माझ्या मोठया नणंदेचे लग्न झालेले होते. दुसरी घरी होती व तिसरी तान्ही म्हणून तिच्या आतेने तिला आपल्याकडे नेले. तिथेच ती लहानाची मोठी झाली. मुलांच्या शिक्षणासाठी घरचे वातावरण तसेच लागते. माझ्या वडीलांचे लग्न झालें त्यावेळी त्यांचे वय 12 वर्षे व आईचे वय आठ वर्षे.

पण पुढे माझे वडील बीए, एलएलबी झाले त्यामुळे आई सुध्दां 3री पर्यत शिकली. माझ्या सासूबाई पण त्यावेळी 7वी पास होत्या कारण ह्यांचे वडील हेडमास्तर होते. माझ्या सगळ्यांत लहान नणंदेल तिच्या आत्याने नेले व सास-यांच्य डोक्यावरची एक जबाबदारी कमी झाली, पण शिक्षणाचे वातावरण त्या घरांत नव्हतेच. मिक्षुकी होती. त्यामुळे माझी नणंद 7 वी पण पास होऊ शकली नाही. मी त्यांच्याहून 4-5 वार्षानी लहान, पण मी मट्रिक झालें होते. मुबईल रेशन दुकानातून मॅट्रिकच्या मुला मुलींना पटापट नोक-या मिळत होत्या. 1946 चा काळ होता तो. युध्द 1945 लाच समाप्त झालेले होते. मुलगी मुंबईला गेली तर नोकरी करील म्हणून वडीलानी मला मुंबईला पाठविलेंच नाही. मुलीने नोकरी केलेले वडीलांना आवडत नसे. सास-यानी उताम आचारी टेवला. त्याच्याकडे सर्व शिकले. व मग सासरे स्वतः स्वयपाक करु लागले. हे मदतीला असतच. सास-यांच्या भावजयीचे भाऊ प्रसिध्द डॉक्टर होते. त्यानी नानांना (सास-यांना) पत्र पाठविले की माणूस आपल्या जुन्या चपलेवर जितके प्रम करतो तेवढे सुद्धां दुस-याच्या मुलावर करत नाही. त्याचा सरळ अर्थ माझी बहीण  तुमचे (दिराचें) कांहीच करणार नाही. म्हणूनच त्यांनी आचारी ठेवून स्वयंपाकाचे शिक्षण घेतले. स्वयंपाकात काय शिकायचे असे मनात येते. पण पाकसिध्दि म्हणजे काय हे करुन पहावे लागते. मराठींत एक म्हण आहे घर पहावे बांधून व लग्न पहावे करून. मी तर म्हणेन स्वयंपाक करावा बघून. मग समजेल कच्चे पक्के. ह्यापासून. उतम चव हा स्वयंपाकाचा गुण आहे. शिवाय मागचा पसारा, मिरचीच्या, कोथिंबिरीच्या, काड्या दाण्यांची टरफले वगैरे सर्व गोष्टी आवरून स्वयंपाकघर स्वच्छ करणे ही एक कलाच आहे. पण तिच्या तंत्राची जाण झाली नाही तर ती कंटाळवाणी होते.